दिनांक :—२६.०४.२०२२

# प्रेसनोट

**लोकसेवक श्री भगवान वडकिले, बिट जमादार पोलीस स्टेशन आखाडा बाळापुर यांनी ५,०००/—रू. लाचेची मागणी करून लाच रक्कम ४०००/— स्वीकारल्याने त्याचे विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

---

तक्रारदार यांनी दिनांक २१.०४.२०२२ रोजी १३.३० वा. तक्रारदार वय २५ वर्ष, व्यवसाय व्यापार पानपटी, रा.जवळा पांचाळ ता. कळमनुरी जि. हिंगोली यांनी तक्रार दिली होती की, 'पोलीस स्टेशन आखाडा बाळापुर येथील बिट जमादार भगवान वडकिले हे माझे विरूध्द पोलीस स्टेशन आखाडा बाळापुर गुरन २२३/२०२१ कलम १८८, २६९, २७०,२७२, २७३, ३२८ भादवी प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयात माझी जप्त असलेली मोटर सायकल चा 'से' कोर्टात दाखल केल्याचा मोबदला म्हणुन ५०००/— रू लाचेची मागणी करीत असून त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी अशी तक्रार दिली होती.

त्यावरून दिनांक २१.०४.२०२२ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता लोकसेवक वडकिले बिट जमादार पोलीस चौकी डोंगरकडा यांनी तक्रारदार यांना ५,०००/— रू. ची लाच मागणी करून तडजोडी अंती ४००० रू लाचेची मागणी करून लाच रक्कम दिनांक २५.०४.२०२२ रोजी १४.३३ वाजता स्विकारली.

त्यावरून वडकिले बिट जमादार पोलीस चौकी डोंगरकडा यांचे विरूध्द पोलीस स्टेशन आखाडा बाळापुर गुरन १८१/२०२२ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी मा. श्री राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद, मा. श्री धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधिक्षिक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री निलेश सुरडकर, पोलीस निरीक्षक, श्री विजय पवार, सपोउपनि श्री युनुस सिद्दीक पोहेकॉ श्री विजय उपरे, पोह श्री विजय शुक्ला, पोना श्री ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोना श्री तान्हाजी मुंढे, पोना श्री महारूद्र कबाडे पोशि श्री सुजित देशमुख, चापोना श्री सरनाईक अॅ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क.—१०६४**, दुरध्वनी क.०२४५६—२२३०५५,
**मोबाईल कमांक :— ९८२२२००९५९**